| MHKO050000902019 | **<u>नियमित दरखास्त क्रं.५/२०१९,</u>**<br>**<u>निशाणी क्रं.२५ वरील आदेश</u>**<br>**रमजान अब्दुल सनदी / दस्तगीर बाबासोा सनदी** |
|---|---|

प्रस्तुत अर्ज वि.प. ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम २९ प्रमाणे प्रस्तुत दरखास्त दिवाणी अर्ज क्रं.२२/२०२२ चा निकाल लागेपर्यंत स्थगीत ठेवणेबाबत दाखल केला आहे.

२. वि.प. यांचे म्हणणे आहे की, त्यांचेविरुध्द रे.क.नं.८३/२०१४ दि.३०/०१/२०१८ रोजी एकतर्फा निकाली झाला असून त्याचे अंमलबजावणीसाठी प्रस्तुत दरखास्त दाखल आहे, त्याला नि.१२ वर वि.प.ने आक्षेप घेतला आहे, मुळ दाव्यावर कॅव्हेट अर्ज दाखल होतात अशी बाब दरखास्तीवर छापली आहे, त्याची चौकशी होणे आवश्यक आहे, मुळ दाव्यात ग्रामपंचायत मिळकत क्रं.३२६१ चा सि.स.नंबर नमूद केला नाही, त्याबाबत दाव्यात मालकीचे कागद हजर केले नाहीत, दाव्याची नोटीस मिळाल्यानंतर ते दरखास्तदार यांना भेटले असता वकीलांनी दावा केल्याचे, दावा वाटपासाठी असल्याने म्हणणे न देण्याबाबत दरखास्तदार यांनी सुचविल्याने त्यांनी सदर मुळ दाव्यास कैफियत अगर म्हणणे दिले नाही, त्यानंतर अपरोक्ष विनाकैफियत व म्हणणे आदेश करुन खरी स्थिती लपवून न्यायालयाची फसवणुक करुन त्या दाव्यात न्यायनिर्णय घेतला आहे, वि.प.ने त्या न्यायनिर्णया विरुध्द एकतर्फा आदेश रद्द होवून मिळणेकरिता दिवाणी अर्ज क्रं.२२/२०२२ दाखल केला असल्याने तो प्रलंबित असेपर्यंत प्रस्तुत दरखास्त स्थगीत करावी अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जाला दरखास्तदार यांनी म्हणणे देवून विरोध केला की, वि.प. यांनी

दावा मिळकती संबंधी कोणताही दावा दाखल केलेला नाही किंवा दावा न्यायप्रविष्ट नाही, त्यामुळे प्रस्तुत अर्ज चालण्यास पात्र नाही, अर्जातील कथनांचा विचार करता येणार नाही, वि.प. हे अर्जदाराला नाहक त्रास देत आहेत, त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा असे कथन केले.

४. अर्जदार व वि.प. यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्ज वि.प. यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम २९ अन्वये प्रस्तुत दरखास्त स्थगीत ठेवण्यासाठी दाखल केला आहे. सदर आदेशाचे व नियमाचे अवलोकन केले असता जर दरखास्तदार व वि.प. यांच्यात एखादा दावा प्रलंबित असल्यास दरखास्त न्यायालयाला जर काही सुरक्षितता अथवा बाब निश्चित केल्यास दरखास्त स्थगीत ठेवता येईल. प्रस्तुत दरखास्तमध्ये दरखास्तदार व वि.प. यांच्यात कोठेही दावा मिळकतीबाबत एखादा दावा प्रलंबित असल्याचे दोघांचेही म्हणणे नाही. केवळ वि.प. व दरखास्तदार यांच्यात दिवाणी अर्ज क्रं.२२/२०२२ हा एकतर्फा निर्णय रद्द होवून मिळणेसाठी प्रलंबित आहे. सदर कायद्यातील तरतूद ही केवळ दावा प्रलंबित असल्यास अंमलात येईल असे त्या कायद्यात स्पष्ट नमूद आहे. मुळ रे.क.नं.८३/२०१४ या दाव्याच्या न्यायनिर्णयाविरुध्द वि.प. हे मा.वरिष्ठ न्यायालयात गेल्याचे दिसत नाही अथवा कोणत्याही मा.वरिष्ठ न्यायालयाने त्या दाव्यातील न्यायनिर्णयास स्थगीती दिल्याचे दिसत नाही. तसेच, कोणत्याही अपीलात मा.वरिष्ठ न्यायालयाने न्यायनिर्णय रद्द बातल केल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रस्तुत दरखास्त ही स्थगीत ठेवण्याचा प्रश्न उद्बभवत नाही. वि.प.ने प्रस्तुत अर्जात वेगवेगळी कथने करुन मुळ दाव्यात वादीने कोणत्या कायदेशीर चुका केल्या याबाबत वेगवेगळी कथने केली आहेत. परंतु, त्याबाबत कोणताही पुरावा त्यावेळी हजर होवून दिला नाही किंवा

या अर्जासोबतही दिला नाही. अर्थात या न्यायालयाला तसा पुरावा दिला असता तरी न्यायनिर्णय बदलण्याचा अधिकार नाहीच. त्यामुळे अर्जातील कथने कोणत्याही प्रकारे ग्राह्य धरणे अपेक्षीत नाहीत. वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत दरखास्त स्थगीत ठेवण्याबाबत कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नसल्याने प्रस्तुत अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारित करतो.

## आ दे श

वि.प. यांचा प्रस्तुत अर्ज (**नि.२५**) नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2023.07.03 17:35:56 +0530

दि.०३/०७/२०२३

(डॉ. डी.जी.पटवे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.